सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं/उपसहायक (गोपनीय) आ. कक्ष/०१/२०२६, मुंबई **दिनांक:** ०६/०९/२०२६

**संदर्भ:** या कार्यालयाचे परिपत्रक समक्रमांक दिनांक ११/०२/२०२६
**विषय:** पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या आज्ञांकित कक्षाबाबत

* * *

## परिपत्रक

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकान्वये, मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आज्ञांकित कक्षासाठी विहित कार्यपद्धतीनुसार पत्रव्यवहार करण्याबाबत सूचित करण्यात आलेले आहे.

२. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम २ (६A) नुसार पोलीस अधिकाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्या दरवर्षी माहे एप्रिल-मे या कालावधीत आस्थापना मंडळ क्र. २ च्या मान्यतेने करण्यात येतात. त्याप्रमाणे सन २०२५-२६ या वर्षातील सर्वसाधारण बदल्या व पदोन्नतीवर नेमणुकांबाबतची कार्यवाही पूर्ण झालेली आहे. तसेच दरम्यानच्या काळात पोउपनि / सपोनि / पोनि यांच्याकडून प्राप्त झालेल्या विनंती अर्जांचा विचार करून बदलीबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

३. सर्वसाधारण बदली संदर्भातील कायदा, नियम व कार्यपद्धती पाळणे आवश्यक असल्याने विनंती बदल्यांसाठी आज्ञांकित कक्ष हे योग्य माध्यम नाही. त्यामुळे अशा विनंतीच्या अनुषंगाने थेट आज्ञांकित कक्ष घेणे उचित नाही. यास्तव, सर्वसाधारण बदली आणि पदोन्नतीवरील नेमणुकीत बदल होण्याबाबत आजपर्यंत आज्ञांकित कक्ष मिळण्याबाबत प्राप्त झालेले **सर्व विनंती अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहेत**.

४. या परिपत्रकाद्वारे असेही सूचित करण्यात येते की, संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी **बदलीकरिता** *(प्रशासकीय / विनंती / संवर्गबाह्य नेमणूक / पदोन्नतीवरील नेमणुकीत बदल इत्यादी प्रकारच्या बदल्या)* सादर केलेल्या अर्जात नमूद कारणांची घटक प्रमुखांनी काटेकोरपणे पडताळणी करावी. अर्जाची शिफारस करताना त्यावर ठोस व सुस्पष्ट अभिप्राय व शिफारस नोंदवून, सदर अर्ज विहित मार्गाने (चाकोरीमार्फत) या कार्यालयातील आस्थापना शाखेकडे पाठविण्यात यावा. सदर परिपत्रक निर्गमित झाल्यानंतर प्राप्त होणारे विनंती बदलीचे परिपुर्ण अर्जाचा विचार सर्वसाधारण बदल्या **२०२६-२७** च्या वेळी विचारात घेतले जातील.

५. याव्यतिरिक्त खालील **विशेष कारणांसाठी आज्ञांकित कक्ष** मिळण्याबाबत अर्ज सादर करता येईल:

- **वैद्यकीय कारण- शासन अधिसुचना दि. १४/७/२०२१ मधील नमूद गंभीर आजारपण:** शासकीय अधिकारी स्वतः किंवा यथास्थिती पती वा पत्नी वा त्यांची मुले वा त्यांच्यावर अवलंबून असलेले व त्यांच्यासोबतच राहणारे शासकीय अधिकाऱ्याचे आई किंवा वडील किंवा भाऊ किंवा बहिन तसेच, महिला अधिकाऱ्यांचे सासरे किंवा सासू यांपैकी कोणीही खालील नमूद गंभीर आजाराने पीडित असल्यास: १. हृदय शस्त्रक्रियांची प्रकरणे, २. मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रिया किंवा किडनी डायलिसिस ३. कर्करोग ४. ब्रेन ट्युमर किंवा मेंदूवरील शस्त्रक्रिया, ५. निश्चेतनावस्था (कोमा), ६. मनोविकृतीने ग्रस्त, ७. अपंग, ८. मतीमंद
- कर्तव्याच्या ठिकाणी असलेल्या अडचणी
- प्रशासकीय कामकाजातील धोरणात्मक अडी-अडचणी
- पदोन्नती मिळण्याबाबतच्या अडचणी

अशा, विशेष कारणास्तव संबंधित अधिकारी/अंमलदार यांनी केलेल्या विनंती अर्जात नमूद कारणांची घटक प्रमुखांनी काटेकोर पडताळणी करून ठोस व सुस्पष्ट अभिप्रायासह उचित शिफारस करावी. वैद्यकीय कारणास्तव असल्यास आजारपणाची खात्री करावी. सदर अर्ज विहित मार्गाने ई-ऑफिसद्वारे (e-Office) या कार्यालयातील उप सहायक (गोपनीय) यांच्याकडे पाठवावे. अशा प्राप्त झालेल्या अर्जांवरच नियमानुसार आज्ञांकित कक्ष घेण्यासाठी वेळ देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

६. तरी सर्व पोलीस घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, सदर बाब आपल्या अधिपत्याखालील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

**(मा. पोलीस महासंचालक, म. राज्य यांच्या मान्यतेने)**

**(सुप्रिया पाटील यादव)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचकरिता

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना / कायदा व सुव्यवस्था / आर्थिक गुन्हे / दहशतवाद विरोधी पथक / विशेषकृती / प्रशासन / वाहतूक / प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन / नागरी हक्क संरक्षण / सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य, मुंबई
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
अपर पोलीस महासंचालक व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, मुंबई / मोटार परिवहन विभाग, पुणे / नक्षल विरोधी अभियान, नागपूर / सागरी सुरक्षा, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना / कायदा व सुव्यवस्था / प्रशासन / प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
सर्व पोलीस अधीक्षक
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १ ते २०

**प्रत माहितीकरिता:**

पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उपअधीक्षक यांनी सदरहू परिपत्रक या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके या सदराखाली प्रकाशित करावे.